**ग्रामीण टंचाईग्रस्त भागात पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या विंधण विहिर उपाययोजनेसाठीचे अनुदान विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांचे मार्फत उपलब्ध करुन देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय, क्र. टंचाई-२००६/प्र.क्र. ४२/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ४ एप्रिल, २००६**

**वाचा :** १. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९

२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-१००३/प्र.क्र. ४२/पापु-१४, दिनांक १७ फेब्रुवारी, २००३

३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे दि. २४ फेब्रुवारी, २००६ चे पत्र क्र. आवेधन / कक्ष २/ टंचाई अनुदान / ११४ /२००६.

**प्रस्तावना :**

पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या ग्रामीण भागात संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये टंचाई निवारक उपाययोजना घेण्यात येतात. या उपाययोजनांतील विंधण विहिर घेणे या उपाययोजनेसाठीचे अनुदान संदर्भ क्र. २ अन्वये संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या मार्फत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात येत होते. मात्र आता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचा विंधण विहिर उपाययोजनेतील सहभाग तांत्रिक स्वरुपाचा राहिलेला असल्याने, तसेच राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या टंचाई कार्यक्रमांतर्गत विंधण विहिर कार्यक्रमाचे सनियंत्रण त्यांचे स्तरावरुन करणे शक्य होत नसल्याने या उपाययोजनेसाठीचे अनुदान पुर्वीप्रमाणेच विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांचे मार्फत उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार ग्रामीण पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत नविन विंधण विहिरी घेणे या उपाययोजनेसाठी अनुदान दि. १ एप्रिल, २००६ पासून विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांचेमार्फत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. यापुढे पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या अन्य उपाययोजनांसह नवीन विंधण विहिरी या उपाययोजनेवर होणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक अनुदानाची मागणी विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे करावी. यामागण्यांमध्ये सन २००४-२००५ वा या त्यापूर्वीच्या प्रलंबीत मागण्या असल्यास त्यांचाही समावेश करावा.

पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत राज्यात घेतलेल्या विंधण विहिरींचा अहवाल यापुढेही संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी शासनास दर सोमवारी सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**(भि. ना. पतिंगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**
विभागीय आयुक्त (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
जिल्हाधिकारी, (मुंबई व बृहन्मुंबई जिल्हा वगळून) (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
कक्ष अधिकारी, व्यय-३/व्यय-९/अर्थसंकल्प-३ व अर्थसंकल्प-१९, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी, म-३, म-७ व म-११ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
पापु-१४ संग्रहासाठी



८८०